मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: 9834138482



# चिखलीत अतिक्रमणांवर बुलडोझरचा घणाघात!

## ५ अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त; १२०० चौरस मीटर क्षेत्र मोकळे

» पिंपरी | प्रतिनिधी

**पिंपरी-चिंचवड शहरातील अनधिकृत बांधकामांविरोधात महापालिकेने कारवाईचा बडगा उगारला असून, चिखली परिसरात मोठी कारवाई करण्यात आली आहे. शरदनगरमधील गल्ली क्रमांक आठ परिसरात महापालिकेच्या अतिक्रमणविरोधी पथकाने धडक मोहीम राबवत तब्बल पाच अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त केली. या कारवाईत सुमारे १२०० चौरस मीटर क्षेत्रावरील अनधिकृत बांधकामे हटवण्यात आली. दोन जेसीबी आणि दोन ट्रॅक्टर ब्रेकरच्या साहाय्याने अवघ्या काही तासांत ही कारवाई पूर्ण करण्यात आली. त्यामुळे अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांना महापालिका प्रशासनाने कठोर इशारा दिला आहे.**



पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या 'फ' तोरणा क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने प्रभाग क्रमांक एकमधील चिखली, शरदनगर परिसरात ही विशेष अतिक्रमणविरोधी मोहीम राबवण्यात आली. महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी आणि अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या आदेशानुसार अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आली.

शहरातील बेकायदा बांधकामांना आळा घालण्यासाठी महापालिका प्रशासनाने कठोर भूमिका घेतल्याचे या कारवाईतून स्पष्ट झाले आहे. 'फ' क्षेत्रीय कार्यालयाचे क्षेत्रीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त अतुल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रत्यक्ष उपस्थितीत ही मोहीम पार पडली. कारवाईपूर्वी महापालिका प्रशासनाकडून आवश्यक यंत्रणा आणि मनुष्यबळाची तयारी करण्यात आली होती.

संबंधित परिसरातील अनधिकृत बांधकामे हटवण्यासाठी अधिकारी, कर्मचारी, सुरक्षा जवान आणि अत्याधुनिक यंत्रसामग्रीचा वापर करण्यात आला. या मोहिमेत उपअभियंता हेमंत घोड, बीट निरीक्षक साईनाथ देसाई, प्रफुल भोकरे, ऐश्वर्या मासाळ आणि सूरज माने यांच्यासह महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते. कारवाईदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, तसेच कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी विशेष सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली होती.

अतिक्रमण विभागाचे सहा पोलीस कर्मचारी आणि महाराष्ट्र सुरक्षा बलाचे (एमएसएफ) तब्बल ५० जवान बंदोबस्तासाठी उपस्थित होते. याशिवाय महापालिकेचे दोन मजूर आणि दहा कंत्राटी मजुरांची मदत घेण्यात आली. दोन ट्रॅक्टर ब्रेकर आणि दोन जेसीबी यंत्रांच्या साहाय्याने अनधिकृत बांधकामे पाडण्यात आली.

नियोजनबद्ध पद्धतीने राबवलेल्या या मोहिमेत पाच बांधकामे हटवून सुमारे १२०० चौरस मीटर क्षेत्रावरील अतिक्रमण निष्कासित करण्यात आले. चिखली परिसरात वाढत्या नागरीकरणाबरोबरच अनधिकृत बांधकामांचा प्रश्नही महत्त्वाचा बनला आहे. अशा परिस्थितीत महापालिकेने हाती घेतलेल्या या कारवाईमुळे अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. प्रशासनाने मोठ्या प्रमाणावर सुरक्षा यंत्रणा आणि यंत्रसामग्री तैनात करून राबवलेल्या या मोहिमेतून बेकायदा बांधकामांबाबत कठोर भूमिका घेतल्याचे दिसून आले.

### सुरक्षा जवानांचा फौजफाटा

चिखलीतील कारवाईसाठी महापालिकेने मोठा फौजफाटा तैनात केला होता. सहा पोलीस कर्मचारी, महाराष्ट्र सुरक्षा बलाचे ५० जवान, बारा मजूर आणि महापालिकेचे अधिकारी-कर्मचारी या मोहिमेत सहभागी झाले होते. दोन जेसीबी आणि दोन ट्रॅक्टर ब्रेकरच्या साहाय्याने पाच अनधिकृत बांधकामे पाडण्यात आली. अवघ्या काही तासांत १२०० चौरस मीटर क्षेत्रावरील अनधिकृत बांधकामे हटवून प्रशासनाने कारवाईचा धडाका दाखवून दिला.

# अभिजात मराठी भाषा सप्ताहात नाना पाटेकरांना भावपूर्ण श्रद्धांजली

» पिंपरी | प्रतिनिधी

**आपल्या दमदार अभिनयाने मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीवर अधिराज्य गाजवणारे ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक आणि पद्मश्री पुरस्कार विजेते नाना पाटेकर यांच्या निधनाने संपूर्ण कलाविश्वावर शोककळा पसरली आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आयोजित 'अभिजात मराठी भाषा सप्ताह' कार्यक्रमात नाना पाटेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उपस्थितांनी त्यांच्या अतुलनीय कलाप्रवासाला आणि सामाजिक कार्याला उजाळा दिला.**



मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील आपल्या वैशिष्ट्यपूर्ण अभिनयशैलीने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे नाना पाटेकर यांचे गुरुवारी (दि. ८ ऑक्टोबर) गोवा येथे हृदयविकाराच्या झटक्याने वयाच्या ७५ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच चित्रपटसृष्टीसह विविध क्षेत्रांतून शोक व्यक्त करण्यात आला.

अभिजात मराठी भाषा सप्ताहाच्या निमित्ताने एकत्र आलेल्या साहित्यप्रेमी, कलारसिक आणि महापालिका अधिकारी-कर्मचाऱ्यांनी त्यांच्या स्मृतींना अभिवादन केले.यावेळी विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी किरण गायकवाड, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, गझलगायक आशिष मुजुमदार, ग्रंथालय प्रमुख प्रतिभा मुनावत, ग्रंथपाल राजू मोहन, प्रवीण चाबुकस्वार, वर्षा जाधव, निदेशक रवींद्र ओव्हाळ, योगिता कोठावदे, बबिता गावंडे, व्ही. आर. कुंभार, शिक्षक गणेश लिंगडे यांच्यासह महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक उपस्थित होते. उपस्थितांनी नाना पाटेकर यांच्या कलाक्षेत्रातील योगदानाचे स्मरण करत त्यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले.

मराठी रंगभूमीपासून आपल्या अभिनय कारकिर्दीची सुरुवात करणाऱ्या नाना पाटेकर यांनी आपल्या प्रतिभेच्या जोरावर हिंदी चित्रपटसृष्टीत स्वतंत्र ओळख निर्माण केली. प्रभावी संवादफेक, चेहऱ्यावरील बोलके भाव, वास्तववादी अभिनय आणि प्रत्येक भूमिकेला न्याय देण्याची विलक्षण क्षमता ही त्यांच्या अभिनयाची वैशिष्ट्ये ठरली. 'परिंदा', 'क्रांतिवीर', 'अब तक छप्पन', 'वेलकम' यांसारख्या चित्रपटांमधील त्यांच्या भूमिका प्रेक्षकांच्या स्मरणात कायम राहिल्या. त्यांच्या उल्लेखनीय अभिनयासाठी त्यांना तीन राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांसह पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले होते.

# ‘बुलेट राजां’ ना वाहतूक पोलिसांचा दणका!

## ४१५ मॉडिफाइड सायलेन्सर जप्त ; सांगवीत बुलडोझर फिरवून केले नष्ट

**पुणे | प्रतिनिधी**

**रस्त्यांवर बुलेटच्या सायलेन्सरमधून फटाक्यांसारखे कर्णकर्कश आवाज काढत फिरणाऱ्या ‘बुलेट राजां’ना पिंपरी-चिंचवड वाहतूक पोलिसांनी दणका दिला आहे. शहरभर विशेष मोहीम राबवून ४१५ बुलेटचे नियमबाह्य सायलेन्सर जप्त करण्यात आले. सांगवी वाहतूक विभागाच्या आवारात जमा केलेल्या या सायलेन्सरवर बुधवारी (दि. ७) बुलडोझर फिरवून ते नष्ट करण्यात आले.शहरात काही बुलेटस्वार कंपनीचा मूळ सायलेन्सर काढून मोठा आवाज करणारे मॉडिफाइड सायलेन्सर बसवितात. अचानक होणाऱ्या फटाक्यांसारख्या आवाजामुळे पादचारी, ज्येष्ठ नागरिक आणि इतर वाहनचालक दचकतात. निवासी परिसरातही या आवाजाचा नागरिकांना त्रास सहन करावा लागतो. अशा बुलेटस्वारांना आळा घालण्यासाठी वाहतूक पोलिसांनी विशेष मोहीम राबविली.**




या मोहिमेत देहूरोड वाहतूक विभागाने सर्वाधिक १०१ सायलेन्सर जप्त केले. त्याखालोखाल पिंपरीत ६०, बावधनमध्ये ४५, सांगवीत ४२, निगडी व चाकणमध्ये प्रत्येकी २५, दिघी-आळंदीत २४, हिंजवडीत २३, भोसरीत २२, चिखलीत १५, तळेगावात १४, वाकडमध्ये १२ आणि म्हाळुंगेत सात सायलेन्सर जप्त करण्यात आले. अशा प्रकारे १३ वाहतूक विभागांतून एकूण ४१५ सायलेन्सर जमा करण्यात आले.

बुलेटचे मॉडिफाइड सायलेन्सर दुचाकींच्या ॲक्सेसरीज विकणाऱ्या दुकानांसह ऑनलाइन संकेतस्थळांवर उपलब्ध आहेत. ‘इंदोरी’, ‘पंजाब’, ‘डॉल्फिन’, ‘शॉर्ट बॉटल’ आणि ‘फ्री फ्लो’ अशा विविध नावांनी त्यांची विक्री होते. साधारण दीड ते साडेतीन हजार रुपयांपर्यंत अनेक प्रकारचे सायलेन्सर मिळतात. काही विशेष प्रकारांची किंमत अधिक असते. मात्र, शहरात जप्त केलेले सायलेन्सर नेमके कोणत्या विक्रेत्यांकडून खरेदी करण्यात आले, याचा तपशील उपलब्ध नाही.

केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ मधील नियम १२० नुसार वाहनाच्या सायलेन्सरने निर्धारित ध्वनिमानकांचे पालन करणे बंधनकारक आहे. मोटार वाहन अधिनियम, १९८८ मधील कलम १९०(२) अंतर्गत ध्वनी किंवा वायुप्रदूषणाच्या मानकांचे उल्लंघन केल्यास पहिल्या गुन्ह्यासाठी दहा हजार रुपयांपर्यंत दंड किंवा तीन महिन्यांपर्यंत कारावास अथवा दोन्ही शिक्षांची तरतूद आहे. तसेच वाहनाच्या रचनेत अनधिकृत फेरबदल केल्यास संबंधित अन्य तरतुदींनुसारही कारवाई होऊ शकते.

> **“वाहनाच्या सायलेन्सरमध्ये अनधिकृत बदल करून कर्णकर्कश आवाज निर्माण करणे हा नियमभंग असून, इतर वाहनचालकांच्या सुरक्षिततेलाही धोका आहे. अशा वाहनांविरोधात कारवाई सुरूच राहणार आहे. वाहनचालकांनी कंपनीने दिलेले मूळ सायलेन्सरच वापरावेत. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांची गय केली जाणार नाही.”**
> **-विक्रांत देशमुख, पोलीस उपायुक्त, वाहतूक विभाग.**

> **“बुलेटच्या इंजिनमधील ज्वलनानंतर तयार होणारे वायू एक्झॉस्ट पाइपमधून बाहेर पडतात. मूळ सायलेन्सरमध्ये आवाज कमी करण्यासाठी विशेष रचना असते. मॉडिफाइड सायलेन्सरमध्ये ती बदलल्याने आवाजाची तीव्रता वाढते. काही वेळा पूर्णपणे न जळलेले इंधन एक्झॉस्टमध्ये पेटल्याने फटाक्यासारखा आवाज निर्माण होतो. याला ‘एक्झॉस्ट पॉपिंग’ किंवा ‘आफ्टरफायर’ म्हणतात. आवाजाची तीव्रता इंजिनची स्थिती आणि सायलेन्सरच्या रचनेवर अवलंबून असते.”**
> **-सुरेश हुंबे, गॅरेजचालक, पिंपरी-चिंचवड.**

# जाधववाडीतील पाण्याच्या टाकीचा परिसर बनला मद्यपी आणि गर्दुल्ल्यांचा अड्डा!

**पुणे | प्रतिनिधी**

**प्रभाग क्रमांक २ अंतर्गत येणाऱ्या जाधववाडी येथील पाण्याच्या टाक्यांचा परिसर सध्या सामाजिक सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत धोकेदायक बनला असून, हा भाग मद्यपी आणि गर्दुल्ल्यांचा खुला अड्डा झाल्याचे समोर आले आहे. या पाण्याच्या टाक्यांभोवती संरक्षक भिंत अथवा कंपाउंड नसल्याने, तसेच जिन्याचे कुलूप तोडलेले असल्यामुळे टवाळखोरांचा आणि समाजकंटकांचा येथे मुक्त संचार वाढला आहे.**





संपूर्ण परिसरात दारू व बिअरच्या फुटलेल्या बाटल्या, गांजा ओढण्यासाठी वापरलेली साहित्य आणि कचऱ्याचे साम्राज्य पसरले आहे. रात्रीच्या वेळी दारू पिऊन हुल्लडबाजी करणे, आरडाओरड करणे आणि नागरिकांना त्रास देण्याचे प्रकार सातत्याने घडत आहेत. काही महिन्यांपूर्वी दारूच्या नशेत येथे गाड्यांची तोडफोड करण्यात आली होती, तर पूर्वी याच पाण्याच्या टाकीखाली एका खुनाची घटनाही घडली होती. या वाढत्या त्रासाला आणि दहशतीला कंटाळून परिसरातील काही नागरिकांनी अक्षरशः आपली घरे बदलल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. लहान मुले थेट पाण्याच्या टाकीवर चढून पतंग उडवत असल्याने मोठ्या दुर्घटनेची शक्यता निर्माण झाली आहे. महापालिका प्रशासन नियमित करवसुली करत असतानाही आणि अनेक वर्षांपासून मागणी असूनही येथे कंपाउंड वॉल उभारण्यात आलेली नाही. महापालिकेच्या या निष्काळजीपणामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.२०१९ पासून म्हणजेच लॉकडाऊनच्या काळापासून आम्ही या पाण्याच्या टाक्यांभोवती संरक्षक भिंत बांधण्याची सातत्याने मागणी करत आहोत. एका महिन्यात काम करण्याचे आश्वासन दिले होते, मात्र अनेक वर्षे उलटूनही प्रशासनाने कोणतीही ठोस उपाययोजना केलेली नाही.

> **“नागरिकांकडून नियमानुसार कर आणि त्यावर दंड आकारला जातो, मग नागरिकांच्या सुरक्षेसाठी निधी का खर्च होत नाही.. प्रशासनाने तत्काळ या पाण्याच्या टाक्यांभोवती संरक्षक कंपाउंड उभे करावे आणि सीसीटीव्ही कॅमेरे बसवून सुरक्षा व्यवस्था करावी, अन्यथा पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन छेडण्यात येईल.”**
> **-विशाल आहेर, युवानेते, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी**

# क्रीडा स्पर्धांमध्ये प्रतिभा महाविद्यालयाचा डंका!

## बॅडमिंटनमध्ये विजेतेपद; वेटलिफ्टिंग, नेमबाजीत पदकांची लयलूट

>> पुणे | प्रतिनिधी

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत आयोजित पुणे जिल्हा विभागीय आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धांमध्ये चिंचवड येथील प्रतिभा महाविद्यालयाच्या खेळाडूंनी दमदार कामगिरी करत आपले वर्चस्व सिद्ध केले. बॅडमिंटनमध्ये महिला संघाने विजेतेपद पटकावले, तर वेटलिफ्टिंग, जलतरण आणि नेमबाजीमध्ये विद्यार्थ्यांनी पदकांची कमाई केली. कलात्मक जिम्नॅस्टिक्समध्येही महाविद्यालयाच्या खेळाडूने आंतरविभागीय स्पर्धेची पात्रता मिळवली. विविध क्रीडा प्रकारांतील या यशामुळे कमला एज्युकेशन सोसायटी संचलित प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कॉम्प्युटर स्टडीजच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.**



पुणे जिल्हा आंतरमहाविद्यालयीन बॅडमिंटन स्पर्धेत प्रतिभा महाविद्यालयाच्या महिला संघाने प्रतिस्पर्धी संघांवर मात करत विजेतेपदावर आपले नाव कोरले. संघातील एस.वाय. बी.ए.ची विद्यार्थिनी अर्पिता आर्डे हिने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले.

तिच्या कामगिरीची दखल घेत आंतरविभागीय स्पर्धेसाठी तिची निवड करण्यात आली आहे. वेटलिफ्टिंगमध्येही प्रतिभाच्या खेळाडूंनी ताकदीची चुणूक दाखवली. एफ.वाय.बी.कॉमचा हर्षद चौधरी याने ९५ किलो वजनी गटात अव्वल स्थान पटकावत सुवर्णपदकावर मोहोर उमटवली. तर वेदांत धोरे याने ६० किलो वजनी गटात द्वितीय क्रमांक मिळवत महाविद्यालयाच्या पदकसंख्येत भर घातली. या दोन्ही खेळाडूंची पुणे जिल्हा संघातून आंतरविभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

जलतरण स्पर्धेत एस.वाय. सी.एस.चा विद्यार्थी प्रथमेश कदम याने २०० मीटर ब्रेस्टस्ट्रोक प्रकारात उल्लेखनीय कामगिरी करत तृतीय क्रमांकासह कांस्यपदक पटकावले. त्याच्या या यशामुळे जलतरण क्रीडा प्रकारातही महाविद्यालयाने आपली छाप उमटवली.

नेमबाजी स्पर्धेत प्रतिभाच्या विद्यार्थिनींनी अचूक लक्ष्यवेध साधत पदकांवर निशाणा साधला. दहा मीटर एअर पिस्तूल प्रकारात एस.वाय.बी.ए.च्या भक्ती नारायणकर हिने प्रथम क्रमांक पटकावला. तर बी.कॉम. (बी.एम.) च्या राजनंदिनी यादव हिने तृतीय क्रमांक मिळवला. या दोघींचीही पुणे जिल्हा संघातून विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

कलात्मक जिम्नॅस्टिक्समध्ये एफ.वाय.बी.कॉमचा विद्यार्थी सार्थक विजय नलावडे याने आपल्या कौशल्याच्या जोरावर आंतरविभागीय स्पर्धेत स्थान निश्चित केले. त्यामुळे वैयक्तिक आणि सांघिक अशा दोन्ही प्रकारच्या स्पर्धांमध्ये प्रतिभा महाविद्यालयाच्या खेळाडूंनी चमकदार कामगिरी नोंदवली आहे.

दरम्यान, नुकत्याच झालेल्या आंतरमहाविद्यालयीन बुद्धिबळ स्पर्धेत सोहन गोळे, अथर्व शिंदे, केतन मोरे, शिवप्रसाद संगमे आणि स्नेहल गुप्ता यांनी महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केले. बुद्धिबळासारख्या बौद्धिक क्षमतेची कसोटी पाहणाऱ्या खेळातही विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवला.

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल कमला एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक सचिव डॉ. दीपक शहा, खजिनदार डॉ. भूपाली शहा, संचालिका डॉ. तेजल शहा, मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ. राजेंद्र कांकरीया, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. क्षितिजा गांधी, उपप्राचार्या डॉ. जयश्री मुळे, क्रीडा संचालक प्रा. संकेत सावेकर आणि प्रा. पांडुरंग इंगळे यांनी सर्व विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन केले. तसेच आगामी आंतरविभागीय स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा प्रकारांत मिळवलेले यश हे त्यांच्या सातत्यपूर्ण मेहनतीचे, जिद्दीचे आणि क्रीडाप्रेमाचे फलित आहे. या कामगिरीमुळे महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील वाटचालीला नवे बळ मिळाले असून, इतर विद्यार्थ्यांनाही क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करण्याची प्रेरणा मिळेल, असा विश्वास संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. दीपक शहा यांनी व्यक्त केला.

# जिल्हा फुटबॉल स्पर्धेत आरकेएल गॅलक्सीच्या रणरागिणींचा डंका!

>> पुणे | प्रतिनिधी

**पुणे जिल्हास्तरीय १४ वर्षांखालील मुलींच्या फुटबॉल स्पर्धेत आरकेएल गॅलक्सी इंटरनॅशनल स्कूलच्या खेळाडूंनी दमदार कामगिरी करत संपूर्ण जिल्ह्यात चौथा क्रमांक पटकावला. मैदानावर आक्रमक खेळ, उत्कृष्ट सांघिक ताळमेळ आणि जिद्दीच्या जोरावर प्रतिस्पर्धी संघांना कडवी झुंज देत शाळेच्या मुलींनी उपांत्य फेरीपर्यंत मजल मारली. या उल्लेखनीय कामगिरीमुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील नावलौकिकात भर पडली आहे.**



पुणे जिल्ह्यातील विविध शाळांच्या संघांचा सहभाग असलेल्या या स्पर्धेत आरकेएल गॅलक्सी इंटरनॅशनल स्कूलच्या मुलींनी सुरुवातीपासूनच आत्मविश्वासपूर्ण खेळाचे प्रदर्शन केले. उपांत्यपूर्व फेरीत प्रतिस्पर्धी संघावर एकतर्फी मात करत संघाने दिमाखात उपांत्य फेरीत प्रवेश केला.

खेळाडूंची चपळाई, अचूक पासिंग, भक्कम बचाव आणि आक्रमक खेळामुळे संघाने स्पर्धेत आपली वेगळी छाप उमटवली. उपांत्य फेरीतील सामना मात्र अत्यंत चुरशीचा ठरला. दोन्ही संघांमध्ये विजयासाठी जोरदार संघर्ष पाहायला मिळाला.

आरकेएल गॅलक्सीच्या खेळाडूंनी अखेरच्या क्षणापर्यंत विजयासाठी शर्थीचे प्रयत्न केले. मात्र, अत्यंत कमी फरकाने त्यांना पराभव स्वीकारावा लागला. त्यानंतर अंतिम क्रमवारीत संघाने जिल्ह्यात चौथे स्थान मिळवत आपल्या गुणवत्तेची चुणूक दाखवली. संपूर्ण स्पर्धेत शाळेच्या खेळाडूंनी दाखवलेली शिस्त, चिकाटी, आत्मविश्वास आणि संघभावना विशेष कौतुकास्पद ठरली.

विजय असो किंवा पराभव, प्रत्येक सामन्यात शेवटपर्यंत लढण्याची वृत्ती या युवा खेळाडूंनी जपली. त्यांच्या कामगिरीमुळे शाळेतील इतर विद्यार्थिनींनाही फुटबॉलसह विविध क्रीडा प्रकारांत सहभागी होण्यासाठी प्रेरणा मिळणार आहे.

या यशाबद्दल शाळेचे व्यवस्थापन, शिक्षक, क्रीडा प्रशिक्षक आणि पालकांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन केले. जिल्हास्तरीय स्पर्धेतील चौथे स्थान हा अंतिम टप्पा नसून भविष्यातील मोठ्या विजयाची सुरुवात असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आगामी स्पर्धांमध्ये आणखी दमदार कामगिरी करत विजेतेपदावर नाव कोरण्याचा निर्धार या युवा फुटबॉलपटूंनी व्यक्त केला.

# नेहरूनगर न्यायालयाची वाहतूक कोंडी फुटणार?

## नोटरी वकिलांच्या जागेसाठी प्रशासन सरसावले; बार असोसिएशनच्या पाठपुराव्याला यश!

**»» पुणे | प्रतिनिधी**

**नेहरूनगर न्यायालय परिसरातील बेशिस्त वाहन पार्किंग, दररोजची जीवघेणी वाहतूक कोंडी आणि नोटरी व्यवसाय करणाऱ्या वकिलांची गैरसोय या गंभीर प्रश्नांवर अखेर प्रशासनाला हालचाली कराव्या लागल्या आहेत. पिंपरी-चिंचवड अॅडव्होकेट्स बार असोसिएशनने केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर अण्णासाहेब मगर स्टेडियमच्या आतील मोकळ्या जागेत तात्पुरते वाहनतळ उभारणे आणि नोटरी वकिलांसाठी स्वतंत्र, सुसज्ज जागा उपलब्ध करून देण्याच्या पर्यायांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. त्यामुळे वर्षानुवर्षे पार्किंग आणि वाहतूक कोंडीच्या समस्येला सामोरे जाणाऱ्या वकील, पक्षकार आणि स्थानिक नागरिकांना दिलासा मिळण्याची आशा निर्माण झाली आहे. मात्र, केवळ पाहणी आणि चर्चेपुरती ही उपाययोजना मर्यादित न राहता तिची प्रत्यक्ष अंमलबजावणी कधी होणार, हा महत्त्वाचा प्रश्न कायम आहे.**



नेहरूनगर न्यायालय परिसरातील पार्किंगची समस्या दिवसेंदिवस गंभीर बनत चालली आहे. न्यायालयात येणाऱ्या वाहनांच्या तुलनेत उपलब्ध पार्किंगची जागा अत्यंत अपुरी असल्याने न्यायालय परिसरातील रस्त्यांवर वाहनांच्या रांगा लागतात. त्याचा थेट परिणाम वाहतुकीवर होत असून परिसरातील नागरिकांनाही मनस्ताप सहन करावा लागत आहे. या प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी पिंपरी-चिंचवड अॅडव्होकेट्स बार असोसिएशनने महापौर रवी लांडगे, क प्रभाग अध्यक्ष निखिल बोऱ्हाडे आणि क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे-पाटील यांना निवेदन दिले होते.

या निवेदनाची दखल घेत क प्रभाग अध्यक्ष निखिल बोऱ्हाडे आणि क क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे-पाटील यांनी अण्णासाहेब मगर स्टेडियम तसेच नेहरूनगर न्यायालय परिसराची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी स्टेडियमच्या आतील बाजूस उपलब्ध असलेल्या मोकळ्या जागेचा तात्पुरत्या वाहनतळासाठी वापर करण्याच्या शक्यतेवर चर्चा करण्यात आली. त्याचबरोबर रस्त्याच्या दुतर्फा नोटरी व्यवसाय करणाऱ्या वकिलांसाठी प्रशस्त प्रवेशद्वारासह स्वतंत्र आणि सुसज्ज जागा निर्माण करण्याच्या पर्यायाचाही आढावा घेण्यात आला.

नेहरूनगर न्यायालयात सुमारे दोन हजार नोंदणीकृत वकील असून दररोज सुमारे तीन हजार पाचशेहून अधिक प्रकरणांचे कामकाज चालते. याशिवाय विविध न्यायालयीन कामांसाठी सुमारे दोन हजार पक्षकार, नागरिक आणि पोलीस कर्मचारी न्यायालयात ये-जा करतात. त्यामुळे सकाळपासूनच न्यायालय परिसरात मोठी वर्दळ असते. मात्र, या दैनंदिन वर्दळीच्या तुलनेत वाहनतळाची व्यवस्था अत्यंत तोकडी आहे.

न्यायालयाच्या बेसमेंटमध्ये पार्किंगची सुविधा उपलब्ध असली तरी वाहनांच्या संख्येच्या तुलनेत ती अपुरी पडत आहे. त्यातच बेसमेंटमध्ये पाणी साचण्याची समस्या असल्यामुळे उपलब्ध जागेचा पूर्ण क्षमतेने वापर करणेही अडचणीचे ठरत आहे. परिणामी वकील, पक्षकार आणि नागरिकांना रस्त्याच्या कडेला वाहने उभी करावी लागत आहेत.

न्यायालय परिसरातील अपुऱ्या पार्किंग व्यवस्थेचा फटका केवळ न्यायालयात येणाऱ्यांनाच नव्हे, तर विठ्ठलनगर आणि लगतच्या परिसरातील रहिवाशांनाही बसत आहे. रस्त्याच्या दुतर्फा उभ्या करण्यात येणाऱ्या वाहनांमुळे वाहतुकीसाठी उपलब्ध जागा कमी होत आहे. त्यामुळे वाहनांची ये-जा करताना अडथळे निर्माण होतात. विशेषतः न्यायालयीन कामकाजाच्या वेळेत परिसरातील वाहतूक कोंडी अधिक गंभीर बनते.

या परिस्थितीमुळे पादचारी, दुचाकीस्वार आणि चारचाकी वाहनचालकांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

# आधीच दिवसाआड पाणी, आता कपातीचा दणका!

**»» पुणे | प्रतिनिधी**

**गेल्या सात वर्षांपासून दिवसाआड पाणीपुरवठ्याचा सामना करणाऱ्या पिंपरी-चिंचवडकरांवर आता आणखी पाणीकपातीचे संकट ओढवले आहे. शहराची दररोजची पाण्याची गरज ७७० दशलक्ष लिटर (एमएलडी) असताना प्रत्यक्षात अवघा ६६५ एमएलडी पाणीपुरवठा होत आहे. आधीच १०५ एमएलडी पाण्याची तूट असताना राज्याच्या जलसंपदा विभागाने १६ ऑक्टोबरपासून आणखी १० टक्के पाणीकपात लागू करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे ऐन सणासुदीच्या काळात नागरिकांच्या पाणीटंचाईच्या समस्येत भर पडण्याची भीती निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे, शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पवना आणि आंद्रा धरणांमध्ये समाधानकारक पाणीसाठा असतानाही कपातीची टांगती तलवार कायम असल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.**



पिंपरी-चिंचवड शहराचा विस्तार झपाट्याने होत असून, वाढती लोकसंख्या, नवीन गृहप्रकल्प आणि औद्योगिक विकासामुळे पाण्याची मागणी सातत्याने वाढत आहे. मात्र, त्या तुलनेत पाणीपुरवठ्याचे नियोजन अपुरे पडत असल्याचे चित्र आहे. शहराला सध्या पवना धरणातून ५४० एमएलडी, आंद्रा धरणातून ९५ एमएलडी आणि एमआयडीसीकडून ३० एमएलडी असा एकूण ६६५ एमएलडी पाणीपुरवठा केला जातो.

मागणी आणि प्रत्यक्ष पुरवठ्यातील मोठ्या तफावतीमुळे अनेक भागांत कमी दाबाने पाणी येणे, अपुरा पुरवठा होणे आणि सोसायट्यांना खासगी टँकरवर अवलंबून राहावे लागणे अशा समस्यांना नागरिकांना सामोरे जावे लागत आहे. महापालिकेने २५ नोव्हेंबर २०१९ पासून शहरात दिवसाआड पाणीपुरवठा सुरू केला. सुरुवातीला तात्पुरत्या स्वरूपाचा वाटणारा हा निर्णय आता सात वर्षांचा टप्पा गाठण्याच्या मार्गावर आहे.

मात्र, एवढ्या दीर्घ कालावधीनंतरही शहरातील नागरिकांना दररोज नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा मिळालेला नाही. अशातच आणखी दहा टक्के कपातीचे निर्देश मिळाल्याने पुढील काळात पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक आणि उपलब्ध पाण्याचे वितरण कसे होणार, हा महत्त्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. राज्यात यंदा एल निनोच्या प्रभावामुळे पर्जन्यमानात घट झाल्याचे सांगण्यात येत आहे. अनेक भागांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, काही तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. आगामी उन्हाळा आणि पुढील पावसाळ्यापर्यंतची पाण्याची गरज लक्षात घेऊन जलसंपदा विभागाने स्थानिक स्वराज्य संस्थांना पाणीकपातीचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार पिंपरी-चिंचवड महापालिकेलाही पवना आणि आंद्रा धरणातून मिळणाऱ्या पाण्यात कपात होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, ६ ऑक्टोबरअखेर पवना धरणात १०० टक्के, तर आंद्रा धरणात ९२ टक्के पाणीसाठा असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे धरणांमध्ये मुबलक पाणीसाठा असतानाही शहराला पाणीकपातीचा सामना का करावा लागणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे. भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी शासनाने खबरदारीची भूमिका घेतली असली, तरी आधीच अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे त्रस्त असलेल्या शहरातील नागरिकांना या निर्णयाचा मोठा फटका बसण्याची शक्यता आहे.

वाकडमधील ३४ सोसायट्यांची आधीच पाण्यासाठी परवड! वाकड परिसरातील २०० ते ५०० सदनिका असलेल्या तब्बल ३४ गृहनिर्माण सोसायट्यांना महापालिकेकडून गरजेच्या केवळ ५० टक्के पाणीपुरवठा होत असल्याचे समोर आले आहे.